भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सह्योगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा प्रकल्प

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक – सिंधुदूर्ग

## कालावधी (दिनांक १३.०५.२०२० ते १७.०५.२०२०)

| अंक ३७@२०२० | दिनांक १२.०५.२०२० | कालावधी ५ दिवस |
|---|---|---|

| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (२८/०४/२०२० ते ०४/०५/२०२० पर्यंत) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पूर्वानुमान (वैधता १३/०५/२०२० ते १७/०५/२०२० पर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५/०५ | ०६/०५ | ०७/०५ | ०८/०५ | ०९/०५ | १०/०५ | ११/०५ | दिनांक | १३/०५ | १४/०५ | १५/०५ | १६/०५ | १७/०५ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ३ | ४ | ३ |
| ३९.० | ३९.० | ३९.० | ३९.० | ३७.० | ३७.० | ३७.० | कमाल तापमान (अं. से) | ४० | ३८ | ३९ | ३७ | ३५ |
| २६.० | २७.० | २७.० | २७.० | २६.० | २५.० | २५.० | किमान तापमान (अं. से) | २८ | २७ | २८ | २८ | २८ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | सकाळ – मेघाच्छादन (ऑक्टा.) | २ | ३ | ५ | ६ | ८ |
| निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | दुपार – मेघाच्छादन (ऑक्टा.) | | | | | |
| ८२ | ८२ | ८० | ८२ | ८५ | ८४ | ७७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ७८ | ८० | ७९ | ८२ | ८४ |
| ४७ | ४७ | ४५ | ५२ | ४७ | ४७ | ४८ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३२ | ३२ | ३४ | ३५ | ४२ |
| १.८ | २.४ | २.४ | २.४ | २.३ | २.४ | १.७ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ६ | ७ | ७ | ९ | ८ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | सकाळ – वा-याची दिशा | पश्चिमोत्तर /वायव्य | पश्चिमे कडे | पुर्वोत्तर आग्नेय कडे | वायव्य कडे | उत्तरोत्तर वायव्य कडे |
| पश्चिमोत्तर /वायव्य | पश्चिमोत्तर /वायव्य | पश्चिमोत्तर /नैऋत्य | पश्चिमोत्तर /वायव्य | पश्चिमोत्तर /नैऋत्य | पश्चिमोत्तर /नैऋत्य | पश्चिमोत्तर /वायव्य | दुपार – वा-याची दिशा | | | | | |

| मागील वर्षातील (२०१९) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२० पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४५९१.० | ०.० | ०.० | ०.० |

**पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती:** सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये येत्या पाच दिवसामध्ये तापमान वाढ संभवत आहे त्याचबरोबर दिनांक १५, १६, व १७ मे, २०२० रोजी तुरळक ठिकाणी सोसाट्याच्या वादळवाऱ्यासह व मेघगर्जने सह हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असून हवामान आर्द्र व अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून वर्तविण्यात आला आहे

## हवामान पुर्वानुमान कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात, भुईमुग, नागली | पूर्वमशागत | भात कापणी केलेल्या भेटतील धसकटे नष्ट करावीत. जय शेतातील काढणी पूर्ण झालेली असेल त्या शेताची नांगरट करून जमीन उन्हात चांगली तापू द्यावी. खरीप हंगामासाठी भात, भुईमुग, नागली इ. पिकांची निवड करुन सुधारीत जातीचे बियाणे ऊपलब्ध करुन ठेवावे. खरीप हंगामातील पिकांच्या दृष्टीने पुर्व तयारीस लागावे. भात पिकाच्या रोपवाटीकेकरिता शेताची मशागत करावी. |
| आंबा | फळविकास ते काढणी व नवीन लागवड | जिल्ह्यामध्ये येत्या ५ दिवसात तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. ज्या ठिकाणी पाण्याची कमतरता भासत आहे अश्या ठिकाणी फळझाडे जगवण्यासाठी व फळझाडांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी सुक्ष्म सिंचन पद्धतीचा (उदा. ठिबक सिंचन) वापर करावा.<br>नवीन आंबा लागवडीमध्ये रोपांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडनेटचे आच्छादन करावे. तसेच रोपांना पाणी देउन अळ्यांमध्ये पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे.<br>जिल्ह्यामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंड्याच्या आकाराची फळे व मोठया आकाराची काढ्णीची फळे अशी अवस्था आहे. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दूपारी चारच्या नंतर नूतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ टक्के (चौदा आणे) पक्वतेला काढावीत.<br>काढलेली फळे साका टाळण्यास्ाठी व उष्णतेपासुन बचाव करण्यासाठी सावलीत ठेवावीत. शिफारसीनूसार बूरशीनाशकाची व ईथीलीनची प्रक्रिया देवुन पिकवावीत. शक्यतो आंब्याची वाहतुक रात्रीच्यावेळी करावी. आंबा फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये. |
| काजु | नवीन लागवड | जमिनीतील ओलावा टिकवुम ठेवण्यासाठी नवीन लागवड केलेल्या झाडांच्या अळ्यात पालापाचोळा, भाताचे तुस किंवा गवत यांचे आच्छादन करावे.<br>जिल्ह्यामध्ये येत्या ५ दिवसात तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. ज्या ठिकाणी पाण्याची कमतरता भासत आहे अश्या ठिकाणी फळझाडे जगवण्यासाठी व फळझाडांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी सुक्ष्म सिंचन पद्धतीचा (उदा. ठिबक सिंचन) वापर करावा.<br>काजुच्या झाडाला रोठा किड लागली असल्यास पाने पिवळी पडतात व खोडामधुन छिद्राद्वारे भुसा बाहेर पड्लेला दिसतो. काजुवर खोड्किडा (रोठा) या किडिचा प्रादूर्भाव आढ्ळून आल्यास १५ मि.मी. पटाशिच्या सहाय्याने प्रादूर्भित साल काढून झाडातील रोठ्याला बाहेर काढून मारुन टाकावे व तो भाग २०% प्रवाही क्लोरोपायरीफॉस ५० मी. लि. १० लिटर पाण्यामध्ये मिसळून चांगला भिजवावा. किंवा ५% प्रवाही फिप्रोनील २ मी. लि. प्रति १ लिटर पाण्यामध्ये मिसळवून चांगला भिजवावा. (एका झाडासाठी ५ लिटर पाणी या प्रमाणात वापरावे) |
| भाजीपाला | पर्ण विकास | भाजीपाला पिकास पाणी देण्यासाठी सुक्ष्म सिंचन पद्धतीचा उदा. ठिबक सिंचन किंवा तुषार सिंचन वापर करावा. पाणी देत असताना सकाळी पाणी द्यावे. |
| फळप्रक्रिया | | आंबा, कोकम, फणस, करवंद, जांभूळ इ. फळांच्या उपलब्धतेनुसार प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करावेत |
| माती परिक्षण | | पिकांच्या काढणीनंतर पिकांची धसकटे, पालापाचोळा, गवत ईत्यादी शेतामध्ये जाळु नयेत, जाळले असता जमिनीतील पिकांच्या पोषण द्रव्यांचा –हास होतो व जमिनीची सुपीकता कमी होते. जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी खरीप पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परीक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितीसाठी मृद शास्त्रK, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला यांचेकडे संपर्क साधावा. (दूरध्वनी क्र. ०२३६६-२६२२३४) |
| दुभती जनावरे, शेळ्या, कुक्कुटपालन | | जनावरांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी गोठ्यामध्ये हवा खेळती राहिल याची दक्षता घ्यावी.<br>दिवसाचे कमाल तसेच रात्रीचे किमान तापमान वाढ्त असल्याने कोंबड्यांचे ऊष्णतेपासुन संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन कापडी पडदे लावुन त्यावर पाणी शिंपडावे. तसेच शेडच्या छतावर गवताचे किंवा गोणपाटाचे आच्छादन घालावे व त्यावर पाणी शिंपडावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील “ग्रामीण कृषि मौसम सेवा” योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.


| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग | डा. प्रदिप च. हळदवणेकर<br>नोडल ऑफिसर<br>(ग्रामिण कृषि मौसम सेवा)<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ | डा. यशवंत च. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>¼०२३६२-२४४२३१½ |
|---|---|---|